# जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा

## -: फेरनिविदा सुचना :-

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा या कार्यालयातील कागदी कातरन (विस्ट पेपरची रद्दी) विकावयाची आहे. करीता ज्या लोकांना कागदी कातरन (रद्दी) विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निविदा या कार्यालयास दिनांक: २०/०९/२०२३ चे सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सादर करावी. त्यानंतर कोणतीही निविदा स्विकारण्यात येणार नाही.

कागदी कातरन (रद्दी) विकत घ्यावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) जमा असलेली कागदी कातरन (रद्दी) अंदाजे ५ टन आहे.
२) निविदांमध्ये दर्शविलेल्या कागदी कातरन (रद्दी) चा भाव हा प्रति ५० किलो प्रमाणे लिहावा.
३) संपुर्ण मालाची किंमत एकमुस्त दयावी लागेल.
४) खरेदीदार यांनी जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांचेकडील रद्दी बारदान्यासह घेतल्यास प्रति बारदाना रुपये २०/- शुल्क अतिरिक्त आकारण्यात येईल.
५) ज्यांना या कार्यालयात निविदा सादर करावयाच्या असतील त्यांनी निविदेसोबत अनामत रक्कम १०,०००/- स्वत: जमा करावी. त्याशिवाय कोणतीही निविदा विचारात घेतली जाणार नाही.
६) ज्यांची निविदा मंजुर होईल त्यांनी कागदी कातरन (रद्दी) मोजुन घेण्याकरीता तराजु, वजन काटा व सर्व माल भरण्याकरीता पोत्याची व्यवस्था करुन तो माल येथुन नेण्याची व्यवस्था करावी.
७) निविदा मंजुर झाल्याचे कळल्यापासुन माल ३ दिवसांचे आंत किंवा वाढविलेल्या मुदतीच्या आंत उचलुन न्यावा लागेल. तसे न केल्यास नविन निविदा पुन्हा बोलविण्यात येईल व माल विकल्या जाईल.
८) असे करतांना सरकारला जे काही नुकसान होईल ते प्रथम ज्यांची निविदा मंजुर झाली होती व ज्याने माल उचलुन नेला नाही, त्यांची अमानत रक्कम सरकारला जमा (फॉरफिटेड) करण्यात येईल व झालेल्या नुकसानाची रक्कम त्यांचेकडुन वसुल करण्यात येईल.
९) कोणतीही निविदा कारण न दाखविता नामंजुर करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा यांना राहिल.

स्वा./-
(आशुतोष एन. करमरकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा.

पृष्ठांकण क्र.४११४/बी-२३-१/९६.
दिनांक :०७/०९/२०२३.
प्रतीलीपी माहीतीस व योग्य कार्यवाहीस अग्रेषित :
१) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
२) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३) तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४) जिल्हा परीषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५) सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६) नगर परिषद, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
७) जिल्हा संगणक प्रणाली, संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.

प्र. प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा.

D:\Stationery\Purchesing Committee 2023\New Nivida-2022.odt